| CNR NO.MHRT090002342023 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२/२०२३ मध्ये नि. ०६ खालील आदेश** |
| --- | --- |

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादींनी वाद मिळकतीत स्वतः अगर इतरांमार्फत कधीही हरकत अडथळा करू अथवा करवू नये तसेच वादीने वाद मिळकतीमध्ये केलेले पिक कापू नये अगर अन्य कोणा मार्फत कापून घेवू नये असा प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत व्हावा यासाठी दाखल केलेला आहे.

अर्जातील वादीचे कथनांचा सारांश पुढील प्रमाणे–

२. वादी हे मौजे पुनस, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील कायमचे रहिवासी असून शेती हा त्यांचे कुटूंबाचा पारंपारीक उपजिविकेचा धंदा आहे. मौजे पुनस, ता. लांजा येथे वादीच्या वाडवडिलोपार्जित मालकी व कब्जा वहिवाटीच्या जमिनी आहेत. त्या पुनस खाते क्र. ३२४, ३२७, ३८० व ४७२ मध्ये समाविष्ट आहेत. पैकी खाते क्र. ३२४ मधील जमिन गट क्र. २११ क्षेत्र ०–११–९० हे. आर., आकार ०.६२ पैसे ही जमिन वादीचे वडीलोपार्जित खुद्द मालकी वहिवाटीची असून ती वादीचे घरापासून जवळच असून ही मिळकत सदरहू दाव्याचा वाद विषयक मिळकत आहे. (इथून पुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येत आहे.). प्रतिवादींचा सदर जमिनीचे मालकी अगर वहिवाटीशी कोणतेही हक्काने कसलाही संबंध केव्हाही नव्हता व नाही. परंतू अलिकडे वादी वयस्कर झालेने तसेच त्यांची तब्बेतही बरी नसते तसेच त्यांचा मुलगा वासुदेव हा नोकरी धंद्यानिमित्त मुंबईला असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे अलिकडे वादींची जमिन बळकावणेचे हेतूने वादीचे सदर जमिनीचे कब्जा वहिवाटीत अनाधिकारे व बेकायदेशीररित्या हरकत,अडथळा करणेची कृत्ये करू लागले आहेत. वाद मिळकत ही मूळ वादीचा सख्खा चूलत भाऊ नागोजी रामा कडू यांचे मालकीची होती त्यांना कोणीही मूलबाळ नसल्याने त्यांचे मृत्यू पश्चात सदर जमिनीला शंकर पांडूरंग कडू याचे नाव दाखल झाले व त्यांचे मृत्यूनंतर सदर जमिनीचे सातबारा

उताऱ्यास फेरफार नोंद क्र. १११ ने सन १९९३ साली दाखल झाले. अशा प्रकारे वाद मिळकत ही वादीचे खुद्द मालकी व कब्जा वहिवाटीची असून सदर जमिनीचे मालकी व कब्जा वहिवाटीशी अन्य कोणाचा कसलाही हक्क संबंध नाही.

३. वाद मिळकत ही वरकस स्वरूपाची असून त्यातून वादी हे भात, नाचणी वगैरे पिक घेतात. सुमारे १५–१६ मण भात व सुमारे मणभर नाचणी पिकते. वादीने वाद मिळकतीतील उत्तर–पूर्वे कडील काही जमिनीत ५–६ वर्षापूर्वी २ माडाची झाडे लावली त्यापैकी १ झाड जगले. तसेच सागाची ५ झाडे त्यापैकी १ मोठे असून बाकीची लहान झाडे आहेत. तसेच १ रामफळाचे झाड ३–४ वर्षापूर्वी लावले आहे. अशाप्रकारे वादी वाद मिळकतीतून दरवर्षी शेती व झाडामाडांचे उत्पन्न घेत असतो. वादीने वाद मिळकतीत कुंपणही केलेले आहे. वादी वयस्कर झाल्याने भाडयाने नांगरणीची मशीन आणून शेती करतात. वादीचा मुलगा हा शेतीच्या हंगामात गावी येवून शेती करतो. चालू वर्षी वादीचे मुलाने वाद मिळकतीत नाचणीची लागवड करणेकरिता नाचणीचे रोप पेरले तसेच बांधाने तुरीची झाडेही लावली.

४. प्रतिवादींचा वाद मिळकतीत मालकी अगर कब्जा वहिवाटीशी केव्हाही संबंध नव्हता व नाही. दि. १३/०६/२०२३ रोजी वादीचा मुलगा वाद मिळकतीमध्ये साफसफाई तसेच कुंपणाची दुरूस्ती करीता गेला होता तेव्हा दुपारचे दरम्यान प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीचा मुलगा काम करीत असलेल्या ठिकाणी आलेत व त्यांनी 'त्यास तु कुंपणाची दुरूस्ती वगैरे करू नकोस यावर्षी सदर जमिनीत आम्ही शेती करणार आहोत, तु आम्हाला विरोध केल्यास तुला भारी पडेल' अशी धमकी देवून शिवीगाळ केली. सबब प्रतिवादींनी स्वतः अगर कोणामार्फत वादीचे वाद मिळकतीत हरकत अडथळा करू अथवा करवू नये तसेच वादीने वाद मिळकतीमध्ये केलेले पिक कापू नये अगर अन्य कोणा मार्फत कापून घेवू नये असा तात्पुरता ताकीदीचा आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादीं विरूध्द होणेची विनंती सदर अर्जाद्वारे वादीने केली.

५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाण २२ येथे त्यांनी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार वाद मिळकत

ही सन १९७१ पूर्वी पासून कुळ हक्काने ते कसत असून वहीवाट करीत आलेले आहेत व आजही करीत आहेत. वाद मिळकतीमध्ये ते भात, नागली व त्यासारखी पिके अखंडपणे घेत आलेले आहेत व आजही घेत आहेत. प्रतिवादी यांनी स्वकष्टाने वाद मिळकतीतध्ये ऊर्जितावस्था आणलेली असून त्यांनी बांध बंधीस्तीसुध्दा केलेली आहे. प्रतिवादी हे वाद मिळकतीतून घेत असलेल्या पिकातून जमिन मालक यांना पिकाचे स्वरूपात अव्याहतपणे खंड देत आलेले आहेत. माहे एप्रिल २०२३ मध्ये जेव्हा वादी यांना त्याचे नाव वाद मिळकतीमध्ये कूळ म्हणून दाखल झालेले नाही असे लक्षात आले तेव्हा त्यांनी दि. २८/०४/२०२३ रोजी तहसिलदार यांचे न्यायालयामध्ये कूळवहिवाटीचा अर्ज दाखल केला.

६. प्रतिवादी यांच्या कब्जावहिवाटीला वादी यांनी कधीही कोणतीही हरकत घेतलेली नव्हती व नाही. वादी यांचा वाद मिळकतीशी कधीही कसलाही संबंध नसल्याने वादीला वाद मिळकतीबाबत कोणतीही वहिवाट व हद्द इत्यादी बाबत कोणतीही माहिती नाही व नव्हती. त्यामुळे वादी यांच्या कोणत्याही विधानाला कोणतेही कायदेशीर आधार नाही. तसेच वादीने महसूल न्यायालयामध्ये प्रकरण दाखल असताना वादीने ही बाब या न्यायालयपासून लपवून ठेवलेली आहे. एका न्यायाधीकरणाकडे दावा चालू असताना, तो प्रलंबित असताना त्याठिकाणी कोणतीही कायदेशीर दाद मागणे कायद्याने अभिप्रेत असताना वादीने जाणूनबुजून या न्यायालयामध्ये दावा केलेला आहे. वादीने सदर दाव्यामध्ये व तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जामध्ये वाद मिळकतीचे केलेले वर्णन हे खोटे व खोडसाळ असून त्यामध्ये वादीने कुठेही वाद मिळकतीच्या चतुःसिमा लिहिलेल्या नाहीत त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केली. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे विरूध्द दि. ०३/०५/२०२४ रोजी 'एकतर्फा' आदेश पारीत केला. सबब सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे म्हणण्या विना चालविण्यात येत आहे.

७. अर्जातील व म्हणण्यातील कथनांनुसार व मागणीनुसार पुढील वाद प्रश्न विचारार्थ उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष

कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **सिध्द करतात.** |
| २ | सोयीची बाब वादीचे बाजूने आहे काय ? | **आहे.** |
| ३ | अर्ज नामंजूर झाल्यास अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **सिध्द करतात.** |
| ४ | आदेश काय ? | **अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.** |

८. वादी व प्रतिवादी यांचे सुविज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**का र ण मि मां सा**

**वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीता**

९. सदर प्रकरणी दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम ३९ नियम १ नुसार दाव्यात शपथ पत्रावरुन किंवा अन्यथा दाव्यातील वादग्रस्त मालमत्तेचा प्रतिवादी यांचेकडून अपव्यय केला जाण्याचा किंवा तीचे नुकसान केले जाण्याचा प्रयत्न अथवा करत असल्याचे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत अशा विरोध कृतीला तात्पुरती मनाई देता येईल. सदर प्रकरणी वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जातील कथने हि शपथ पत्रावर केलेली आहेत. अशा परिस्थितीत अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

१०. वाद मिळकत ही वादीचे मालकी वहिवाटीची आहे हे दर्शविण्यासाठी निशाण ५/१ येथे वाद मिळकतीचा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. सदर सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता वाद मिळकतीचे भोगवाटदार वादी असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. निशाण ५/४ येथे

वादीने छायाचित्र दाखल केलेले आहेत. यावरून वादीचे कथन आहे की, प्रतिवादी हे वादीच्या मुलास हरकत अडथळा करीत असल्याचे सिध्द होते. सदर छायाचित्रांचे अवलोकन केले असता छायाचित्रामध्ये कोण इसम आहे व सदरची मिळकत आहे हे सद्यस्थितीत दिसून येत नाही असे सकृतदर्शनी दिसून येत आहे. सबब सदर छायाचित्रांवरून कोण कोणास अडथळा करीत आहे हे सपष्ट होत नाही. प्रतिवादीचे कथनानुसार वादीने दाव्यात वंशावळ दिलेली असून वाद मिळकत वादीचे नावावर कशी झाली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे त्यास सदर दाव्याच्या दाद मागता येत नाही. परंतू वर नमूद सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता व निशाण २९ येथील प्रतिवादी यांनी वादीस दिलेली कूळवहिवाट दावा क्र. ३५/२०२३ ची नोटीस याचे अवलोकन केले असता सद्यस्थितीत दावा मिळकतीचे भोगवाटदार सदरी वादीचे नाव असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. यावरून वादी हा वाद मिळकतीचा मालक असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

११. प्रतिवादीचे कथनानुसार प्रतिवादी वाद मिळकतीमध्ये कुळ म्हणून कब्जेवहिवाटीस आहे. सदर बाब दर्शविण्यासाठी प्रतिवादी यांनी निशाण २१/१ येथे लांजा पोलिस ठाणे येथे वादी विरूध्द केलेली तक्रार व निशाण २१/२ येथे प्रतिवादी यांनी तहलिसदार लांजा यांचे न्यायालयामध्ये दाखल केलेला कुळवहिवाटीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रांवरून प्रतिवादी हे वाद मिळकतीचे कुळ म्हणून कब्जेवहिवाटदार असल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी प्रतिवादी हे वाद मिळकतीचे कब्जेवहिवाटदार आहेत किंवा कसे ही बाब न्यायप्रविष्ट असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार वाद मिळकतीच्या सदरी कुळ म्हणून त्यांची नोंद लागली नसल्याचे त्यांना सन २०२३ मध्ये समजले. सदर कथनावरून व वाद मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावरून प्रतिवादी यांची कुळ म्हणून नोंद वाद मिळकतीच्या सातबारा सदरी नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

१२. प्रतिवादी यांनी निशाण २१/२ येथे तहसिलदार लांजा यांचे

समक्ष दाखल कुळवहीवाटीच्या अर्जासोबत असलेल्या प्रतिज्ञालेखांवर आपली भिस्त ठेवून त्यावरून ते वाद मिळकतीचे कब्जेवहिवाटदार असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रतिज्ञालेखांचे अवलोकन केले असता वनिता गंगाराम पांचाळ माझी सरपंच व सुनिल महादेव कडू वाद मिळकतीच्या लगत असलेल्या मिळकतीचे कब्जेदार यांनी शपथेवर प्रतिवादी क्र. १ हे वाद मिळकतीमध्ये कुळ हक्काने वहिवाट करीत असल्याचे कथन केलेले आहे. उलटपक्षी वादी यांनी वाद मिळकतीचे लगत कब्जेदार मधुकर पांडुरंग कडू यांचे प्रतिज्ञापत्र निशाण २८ येथे दाखल केलेले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता त्यांनी शपथेवर वादी वाद मिळकतीमध्ये पूर्वीपासून कब्जेवहीवाटदार असल्याचे कथन केलेले आहे. उभय पक्षकारांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठयर्थ इतर कब्जेदारांची व व्यक्तिंची प्रतिज्ञापत्रे दाखल करून आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. शपथपत्राच्या विरूध्द शपथपत्र असल्याने सदरचे शपथपत्र हे दावा गुणदोषावर चालल्याशिवाय उभयपक्षकारांच्या बाजूने सद्यस्थितीत वाचता येणार नाही असे सकृतदर्शनी दिसून येते. म्हणून सद्यस्थितीत सदर शपथपत्राचा आधार उभय पक्षकारांना घेता येणार नाही असे सकृतदर्शनी दिसून येते.

१३. प्रतिवादी यांनी दाखल केलेली निशाण २५/४ येथील नमूना सहा 'क' उतारा व २५/५ येथील फेरफार पत्रक क्र. १११ चे अवलोकन केले असता मयत शंकर पांडुरंग कडू यांचे पश्चात दावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस वारस म्हणून केशव पांडुरंग कडू यांचे नावाची नोंद असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तसेच मिळकतीच्या सातबारा सदरी कूळ म्हणून प्रतिवादी यांच्या नावाची नोंद नाही असेही सकृतदर्शनी दिसून येत आहे. सद्यस्थितीत प्रतिवादी हे वाद मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. उलटपक्षी वादी हे वाद मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

१४. प्रतिवादी यांनी युक्तीवाद केला की, वादी यांनी दाखल केलेल्या निशाण ३१/१ येथील चॅप्टर केस रजि. क्र. ८०/२०२३ मधील पोलिस श्री. एन. एस. नावळेकर यांचे अहवालात शुभदा एकनाथ कडू व एकनाथ रामचंद्र कडू

हे श्री. केशव पांडुरंग कडू यांचे तोंडी संमतीने वाद मिळकतीमध्ये गेली ७० वर्षे शेती करून उदरनिर्वाह करतात असे नमूद आहे. यावरून प्रतिवादी हे वाद मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस असल्याचे दिसून येते असे कथन केले. सदर अहवालाचे अवलोकन केले असता जरी सदरचा मजकूर अहवालामध्ये नमूद असला तरी वादीचे सध्याचे वय ७६ वर्षे आहे. अहवाल सन २०२३ सालचा आहे. सत्तर वर्षापूर्वी वादीचे वय ६ वर्षे अंदाजे होते त्यावेळी वादी तोंडी संमती देवू शकत नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांच्या संमतीने प्रतिवादी वाद मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस आलेल्याचे सद्यस्थितीत सकृतदर्शनी दिसून येत नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवर आपला हक्क सांगितलेला आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी वादीस हरकत अडथळा करून वाद मिळकतीमधील पिक कापण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१५. यावरून प्रतिवादी यांनी वादीच्या शांततामय कब्जा वहिवाटीस वाद मिळकतीवर आपला हक्क सांगून हरकत अडथळा केलेल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. वादीच्या असलेल्या वाद मिळकतीच्या कब्जे व वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केलेल्याचे वादी यांनी प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. वादी यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला तर वादीचे न भरून निघणारे नुकसान होणार आहे याची शक्यता नाकारता येत नाही. उलटपक्षी प्रतिवादी यांचे सदर आदेशामुळे कोणतेही संभाव्य नुकसान होणार नाही असे दिसून येत आहे. म्हणून सोयीची बाजू ही वादीच्या बाजूने आहे हे सिध्द होते. म्हणून वादप्रश्न क्र. १ व ३ याचे निष्कर्ष सिध्द करीत आहे असा नोंदवित आहे, वादप्रश्न क्र. २ चा निष्कर्ष होकारार्थी असा नोंदवित आहे. सदरचा अर्ज वादी यांना दाखल करण्यास प्रतिवादी यांनी भाग पाडले म्हणून सदर अर्जाचा खर्च हा प्रतिवादी यांच्यावर ठेवण्यात येतो. वादप्रश्न क्रमांक ४ करीता पुढील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. वादी याचा निशाण ०६ येथील अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादीचे मालकी कब्जा वहीवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत कधीही हरकत अडथळा करू अथवा

करवू नये तसेच वादीने वाद मिळकतीमध्ये केलेले पिक कापू नये अगर अन्य कोणा मार्फत कापून घेवू नये असा प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश देणेत येत आहे.

PRATHAMESH RAMESH BHOSALE
Digitally signed by PRATHAMESH RAMESH BHOSALE
Date: 2024.05.06 15:04:30 +0530

**दिनांक ०३/०५/२०२४** **(प्र.र.भोसले)**

**ठिकाण लांजा.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लांजा,**

**ता.लांजा, जि.रत्नागिरी**

# CERTIFICATE

*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*

| | |
|---|---|
| *Case No :* | *R.C.S. No 32 of 2023* |
| *Name of the Stenographer:* | *S. D. Chavan* |
| *Court Name:* | *Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,* |
| *Date of decision :* | *03/05/2024.* |
| *Judgment/Order signed by P.O.on :* | *03/05/2024.* |
| *Judgment/Order uploaded on :* | *06/05/2024.* |